# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
**Formerly Pune University**

**अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**
**गणेशखिंड, पुणे—४११००७**
**दूरध्वनी क्रमांक: ०२०—२५६२१०४४/५/८/९**
**ई—मेल : iqac@unipune.ac.in**
**संकेतस्थळ - www.unipune.ac.in**

**Internal Quality Assurance Cell**
**Ganeshkhind, Pune – 411007**
**Contact No. : 020-25621044/5/8/9**
**E-mail - iqac@unipune.ac.in**
**Website – www.unipune.ac.in**

**अंगुहक/२९६/२०२५** **दिनांक : १२/०७/२०२५**

**अत्यंत महत्वाचे व तातडीचे**

**प्रति,**

**मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख**
**सर्व सलंग्नित महाविद्यालये,**
**मान्यताप्राप्त परिसंस्था व विभागप्रमुख**
**प्रस्तुत विद्यापीठ**

**विषय — विद्यापीठ विभाग/संलंग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थाचे प्राचार्य/संचालक शैक्षणिक आणि संशोधन समन्वयक (ARC) यांची माहिती ऑनलाईन पद्धतीने अद्ययावत करणेसाठी मुदत वाढीबाबत.......**

मा. महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षामध्ये संशोधन प्रकल्प आविष्कार/अन्वेषण इतर संशोधन योजना अशा अनेक योजनांची प्रभावी व विहीत वेळेत अंमलबजावणी करण्यासाठी विद्यापीठ विभाग/संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख यांच्या मार्फत शैक्षणिक आणि संशोधन समन्वयक (ARC) म्हणून नेमण्यात येते. आविष्कार/अन्वेषण स्पर्धेमध्ये सहभागी महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/विद्यापीठातील शैक्षणिक विभागातील शैक्षणिक आणि संशोधक समन्वयक (ARC) यांना विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार मानधन देण्यात येते. या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२५—२६ मध्ये संलंग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/विद्यापीठातील शैक्षणिक विभागातील एका अध्यापकास शैक्षणिक आणि संशोधक समन्वयक (ARC) म्हणून नामनिर्देशन करून अध्यापकांची संपूर्ण माहिती खाली नमूद केलेल्या लिंकवर ऑनलाईन पध्दतीने **दि. १५ जुलै, २०२५** पर्यंत भरून **संलंग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/विद्यापीठातील शैक्षणिक विभागाच्या लेटरहेडवर मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख यांच्या स्वाक्षरीने नामनिर्देशीत केलेले पत्र ऑनलाईन अपलोड करून सहकार्य करावे**. जेणेकरून संशोधन स्पर्धा व इतर संशोधन योजना कारणास्तव या सर्वांशी जलद व प्रभावीपणे संपर्क करणे शक्य होईल. तसेच त्यांना देण्यात येणारे मानधन थेट त्यांच्या बॅक खात्यामध्ये जमा करणे सहज शक्य होईल.

unipune.ac.in--BOD Online --Enter Your Credentials --In Urgent Notification Tab--Online ARC information

प्रा. डॉ. विनायक जोशी
संचालक
अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
पुणे ४११००७